**प्रेस नोट ०९/०६/२०१९**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**
**गहाळ पर्स ताब्यात दिलेबाबत.**

दि.०४/०६/२०१९ रोजी मपोना हर्षदा कांबळे यांना शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन डयुटी असताना दुपारी १३.३६ वा चे सुमारास इसम कुमार पांडुरंग भोगाडे,रा. १२५/३अ शिवदर्शन पर्वती,पुणे हे त्यांचे चारचाकी वाहनातुन जात असताना त्यांना सेलो प्लॅटीना बिल्डींग एफ सी रोड शिवाजीनगर पुणे येथे सार्वजनिक रोड वर एक पर्स मिळुन आली. त्या पर्स मध्ये गाडीची चावी, बँकेचे एटीअम, २००० रुपये रोख असे होते. त्यांनी सदरची पर्स ही लागलीच शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे येवुन मपोना.कांबळे यांच्या ताब्यात दिली असता,त्यांनी सदर पर्स कोणाची आहे हे पाहण्यासाठी त्यामध्ये काही ओळखपत्र अगर संपर्क क्रमांक मिळतो का हे पाहत असताना एक महिला त्यांची पर्स हरवली असलेबाबत तक्रार देण्यासाठी पोलीस ठाणे येथे आल्या. त्यावेळी मपोना.हर्षदा कांबळे यांनी कुमार भोगाडे यांना सापडलेली पर्स त्यांना दाखवुन ही पर्स तुमची आहे अगर कसे याबाबत खात्री केली असता,सदर महिलेने ती पर्स माझी असल्याचे सांगितले. त्यावेळी ठाणे अमंलदार म्हणुन असलेले पोउपनिरी.सुर्यभान कदम यांनी सदर महिलेस त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सलोनी पिंपळकर असे सांगुन ती पर्स सेलो प्लॅटिना बिल्डींगसमोर पडली असल्याचे सांगितल्याने पोउपनिरी.कदम यांनी त्याबाबत पुर्ण खात्री करुन घेवुन सदरची पर्स ही सलोनी पिंपळकर यांच्या ताब्यात दिलेली आहे.

इसम नामे कुमार पांडुरंग भोगाडे यानी त्यांना मिळुन आलेली पर्स ही प्रामाणिकपणे पोलीस ठाणे येथे आणुन जमा केलेली असुन, मपोना.हर्षदा कांबळे यांनी सदरची पर्स कोणाची आहे याबाबतची माहिती काढण्याचा प्रयत्न करुन सदरची पर्स ही सलोनी पिंपळकर हीस परत केलेली आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बापू शिंदे,पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी.सुर्यभान कदम, मपोना.हर्षदा कांबळे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

